शिक्षण मंडळ कराड, संचालित

# महिला महाविद्यालय कराड

## अर्थशास्त्र विभाग

## बहुपर्यायी प्रश्न

विषय - **सूक्ष्म अर्थशास्त्राची मूलतत्वे पेपर II**

बी.ए भाग - III सेम - VI

### मॉड्युल - III

### अपूर्ण स्पर्धा

**1)** पुढीलपैकी कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने अपूर्ण स्पर्धेची संकल्पना मांडली आहे ?

अ) प्रा चेंबरलीन   ब) श्रीमती जोन रॉबिन्सन   क) डॉ मार्शल   ड) जे एम केन्स

**2)** पुढीलपैकी कोणत्या स्पर्धेच्या बाजारात पूर्ण स्पर्धा आणि मक्तेदारी स्पर्धा यांची काही वैशिष्ट्ये आढळून येतात ?

अ) अल्पविक्रेताधिकार स्पर्धा  ब) अपूर्ण स्पर्धा   क) द्वियधिकार स्पर्धा   ड) वरीलपैकी सर्व

**3)** ज्या स्पर्धेच्या बाजारात काही अंशतः स्पर्धा आणि मक्तेदारी  दिसून येते अशा स्पर्धेच्या बाजाराला............ असे म्हणतात.

अ) अल्पविक्रेताधिकार स्पर्धा  ब) अपूर्ण स्पर्धा   क) द्वियधिकार स्पर्धा   ड) पूर्ण स्पर्धा

**4)** पुढीलपैकी कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने अपूर्ण स्पर्धेचे ऐवजी मक्तेदारीयुक्त स्पर्धेची संकल्पना मांडली आहे ?

अ) प्रा चेंबरलीन   ब) श्रीमती जोन रॉबिन्सन   क) डॉ मार्शल   ड) जे एम केन्स

**5)** अपूर्ण स्पर्धेच्या बाजाराची पुढीलपैकी कोणती गुण वैशिष्ट्ये दिसून येतात

अ) मर्यादित विक्रेते   ब) विक्रेत्यांचे स्वतंत्र धोरण   क) बिगर किंमत स्पर्धा  ड) वरीलपैकी सर्व

**6)** पुढीलपैकी कोणते गुणवैशिष्ट्ये अपूर्ण स्पर्धेच्या बाजाराचे आहे ?

अ) एकच उत्पादक   ब) एकच किंमत   क) वस्तू भेद   ड) एकजिनसी वस्तू

**7)** अपूर्ण स्पर्धेच्या बाजारात वस्तूची मागणी............ असते.

अ) लवचिक   ब) अलवचिक   क) जास्त लवचिक   ड) कमी लवचिक

**8)** आपली वस्तू इतरांपेक्षा वेगळे आहे हे दाखवण्यासाठी अपूर्ण स्पर्धेच्या बाजारात विक्रेत्यांकडून......... केला जातो.

अ) किंमत भेद ब) वस्तू भेद क) विक्री खर्च ड) वरील पैकी सर्व

**9)** वस्तूच्या मागणीत वाढ घडवून आणण्यासाठी अपूर्ण स्पर्धेच्या बाजारात विक्रेत्याकडून पुढील पैकी कोणत्या मार्गाचा अवलंब केला जातो ?

अ) जाहिरात ब) वस्तूभेद क) व्यापारी चिन्हांचा वापर ड) वरीलपैकी सर्व

**10)** अपूर्ण स्पर्धेच्या बाजारात मागणी वक्र हा.......... असतो.

अ) क्ष अक्षाला समांतर ब) य अक्षाला समांतर क) डावीकडून उजवीकडे खाली येणारा ड) डावीकडून उजवीकडे वर जाणारा

**11)** अपूर्ण स्पर्धेच्या बाजारांमध्ये अल्पकाळात उद्योग संस्थेला........ प्राप्त होतो.

अ) साधारण नफा ब) असाधारण नफा क) साधारण तोटा ड) असाधारण तोटा

**12)** अपूर्ण स्पर्धेच्या बाजारात उद्योग संस्थेचा समतोल होण्यासाठी पुढील पैकी कोणते निकष/अटी पूर्ण होणे आवश्यक आहे.

अ) सी.प्राप्ती=स.प्राप्ती ब) सी.प्राप्ती=सी.खर्च क) सी.खर्च=स.खर्च ड) स.प्राप्ती=स.खर्च

**13)** अपूर्ण स्पर्धेच्या बाजारांमध्ये दीर्घकाळात उद्योग संस्थेला........ प्राप्त होतो.

अ) साधारण नफा ब) असाधारण नफा क) साधारण तोटा ड) असाधारण तोटा

**14)** अपूर्ण स्पर्धेच्या बाजारात प्रत्येक उद्योग संस्थेचे उत्पादन आणि किंमत विषयक धोरण........... असते.

अ) समान ब) स्वतंत्र क) परस्पर विरोधी ड) परस्पर पूरक सर्व

**15)** वस्तूभेद हे पुढीलपैकी कोणत्या स्पर्धेच्या बाजाराचे प्रमुख वैशिष्ट्य आहे .

अ) पूर्ण स्पर्धा ब) मक्तेदारी स्पर्धा क) अपूर्ण स्पर्धा ड) वरीलपैकी सर्व

**16)** वस्तूभेद करण्यासाठी विक्रेत्यांकडून पुढीलपैकी कोणत्या मार्गाचा अवलंब केला जातो

अ) वस्तूच्या दर्जात बदल ब) वस्तूचा रंग व आकारात बदल क) बाह्य वेष्टनात बदल ड) वरीलपैकी सर्व

**17)** पुढीलपैकी कोणत्या उद्देशाने विक्रेत्याकडून वस्तूभेद केला जातो ?

अ) वस्तूची विक्री वाढविणे ब) बाजारपेठ काबीज करणे क) नफा मिळवणे ड) वरीलपैकी सर्व

**18)** वस्तूभेदाचे पुढीलपैकी कोणते प्रमुख प्रकार आहेत **?**

अ) वास्तव वस्तूभेद ब) कृत्रिम वस्तूभेद क) वरीलपैकी दोन्हीं ड) वरीलपैकी फक्त एक

**19)** वस्तूभेद करण्यासाठी विक्रेत्याकडून पुढीलपैकी कोणत्या मार्गाचा अवलंब केला जातो **?**

अ) बाह्य फरक ब) विशिष्ट चिन्हांचा वापर क) जाहिरात ड) वरीलपैकी सर्व

**20)** अल्पविक्रेताधिकार हा पुढीलपैकी कोणत्या स्पर्धेचा एक उपप्रकार आहे **?**

अ) पूर्ण स्पर्धा ब) मक्तेदारी स्पर्धा क) अपूर्ण स्पर्धा ड) वरीलपैकी सर्व

**21)** जेव्हा वस्तू व सेवांच्या बाबतीत संख्येने अल्प असणाऱ्या विक्रेत्यांचे बाजारपेठेवर नियंत्रण किंवा मक्तेदारी प्रस्थापित झालेली असते अशा स्पर्धेच्या बाजाराला......... असे म्हणतात.

अ) पूर्ण स्पर्धा ब) मक्तेदारी स्पर्धा क) अपूर्ण स्पर्धा ड) अल्पविक्रेताधिकार स्पर्धा

**22)** अल्पविक्रेताधिकार स्पर्धेच्या बाजाराची पुढीलपैकी कोणती वैशिष्ट्ये दिसून येतात **?**

अ) विक्रेत्यांची अल्पसंख्या ब) परस्परावलंबन क) वस्तू भेद ड) वरीलपैकी सर्व

**23)** पुढीलपैकी कोणत्या प्रकारच्या बाजारात किंमत युद्धाची परिस्थिती दिसून येते **?**

अ) पूर्ण स्पर्धा ब) मक्तेदारी स्पर्धा क) अपूर्ण स्पर्धा ड) अल्पविक्रेताधिकार स्पर्धा

**24)** पुढीलपैकी कोणत्या बाजारामध्ये फक्त दोनच विक्रेते असतात**?**

अ) द्वियधिकार स्पर्धा ब) मक्तेदारी स्पर्धा क) अपूर्ण स्पर्धा ड) अल्पविक्रेताधिकार स्पर्धा

**25)** द्वियधिकार स्पर्धा पुढीलपैकी कोणत्या स्पर्धेच्या बाजाराचा उपप्रकार आहे **?**

अ) पूर्ण स्पर्धा ब) मक्तेदारी स्पर्धा क) अपूर्ण स्पर्धा ड) अल्पविक्रेताधिकार स्पर्धा

**उत्तरे**

**1**-ब, **2**-ब, **3**-ब, **4**-अ, **5**-ड, **6**-क, **7**-क, **8**-ब, **9**-ड, **10**-क, **11**-ब, **12**-ब, **13**-अ, **14**-ब, **15**-क, **16**-ड, **17**-ड, **18**-क, **19**-ड, **20**-क, **21**-ड, **22**-ड, **23**-ड, **24**-अ, **25**-क

## मॉड्युल - IV

## उत्पादन घटक किमंत निश्चिती

**1)** सीमांत उत्पादन घटकामुळे एकूण उत्पादनात होणारी प्रत्यक्ष वाढ म्हणजे.............. होय.

अ) सरासरी उत्पादकता ब) सीमांत उत्पादकता क) सरासरी प्राप्ती ड) सीमांत प्राप्ती

**2)** सीमांत उत्पादनातील वाढीमुळे पुढील पैकी कोणत्या उत्पादनामध्ये वाढ होते ?

अ) सरासरी ब) सीमांत क) एकूण ड) वरीलपैकी सर्व

**3)** सीमांत उत्पादकता सिद्धांत पुढीलपैकी कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने मांडला आहे ?

अ) डेव्हिड रिकार्डो ब) □डम स्मिथ क) जे बी क्लार्क ड) डॉ मार्शल

**4)** सीमांत उत्पादकता सिद्धांतानुसार उत्पादन घटकांना मिळणारा मोबदला हा त्या उत्पादन घटकांच्या.......... एवढा असतो.

अ) सरासरी उत्पादकता ब) सीमांत उत्पादकता क) सरासरी प्राप्ती ड) सीमांत प्राप्ती

**5)** उत्पादन घटकातील वाढीबरोबर उत्पादन घटकांच्या सीमांत उत्पादकतेत........... होत जाते

अ) वाढ ब) घट क) जास्त वाढ ड) कमी घट

**6)** सीमांत उत्पादकता सुरवातीला............जाते आणि त्यानंतर ती............जाते.

अ) वाढत, वाढत ब) वाढत, घटत क) घटत, घटत ड) घटत, वाढत

**7)** आधुनिक खंड सिद्धांतानुसार पुढीलपैकी कोणत्या उत्पादन घटकांना खंड मिळतो ?

अ) भूमी व श्रम ब) भांडवल क) संयोजक ड) वरीलपैकी सर्व

**8)** आधुनिक खंड सिद्धांतानुसार उत्पादनाचे घटक...... असतील तर सर्वच उत्पादन घटकांना खंड प्राप्त होईल.

अ) लवचिक ब) दुर्मीळ क) मुबलक ड) अलवचिक

**9)** पुढीलपैकी कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने आधुनिक खंड सिद्धांताचे विश्लेषण केले आहे ?

अ) डॉ मार्शल ब) जोन रॉबिन्सन क) प्रा बेनहॅम ड) वरीलपैकी सर्व

**10)** डेव्हिड रिकार्डो यांच्यामते खंड हा फक्त................या उत्पादन घटकाचे मिळतो.

अ) भूमी ब) श्रम क) भांडवल ड) संयोजक

**11)** आधुनिक खंड सिद्धांतानुसार...............काळात उत्पादन घटकांचा पुरवठा दुर्मिळ व लवचिक असल्यामुळे उत्पादन घटकांना खंडे प्राप्त होतो

अ) दीर्घ ब) अल्प क) भविष्य ड) भूतकाळात

**12)** श्रीमती जोन रॉबिन्सन यांच्यामते उत्पादन घटकांच्या किमान पुरवठा किमतीपेक्षा जादा मिळणाऱ्या उत्पन्नास...... असे म्हणतात.

अ) खंड ब) वेतन क) व्याज ड) नफा

**13)** पुढीलपैकी कोणी खंडाचे मोजमाप करण्यासाठी बदली उत्पन्नाची संकल्पना मांडली आहे ?

अ) डॉ मार्शल ब) जोन रॉबिन्सन क) प्रा बेनहॅम ड) जे बी क्लार्क

**14)** उत्पादन घटकाचा एखादा नग एखाद्या विशिष्ट उद्योगात रहावा म्हणून त्या घटकाला जी कमीत कमी किंमत देणे आवश्यक असते त्या किमतीला............असे म्हणतात.

अ) वेतन ब) व्याज क) नफा ड) बदली उत्पन्न

**15)** जे एम केन्स यांच्या मते रोखतेच्या त्यागाबद्दल दिला जाणारा मोबदला म्हणजे........... होय.

अ) वेतन ब) व्याज क) नफा ड) खंड

**16)** व्याजाच्या सनातनवादी सिद्धांतानुसार व्याजदर हा.......च्या मागणी पुरवठा वरून ठरतो.

अ) पैशाच्या ब) श्रमाच्या क) भांडवलाच्या ड) भूमीच्या

**17)** व्याजाच्या सनातनवादी सिद्धांतानुसार ज्याठिकाणी भांडवलाच्या मागणी आणि पुरवठ्याचा................ होतो त्या ठिकाणी व्याजदर निश्चित होतो.

अ) असमतोल ब) समतोल क) संयोग ड) स्पर्श

**18)** जे एम केन्स यांच्या मते व्याज म्हणजे..........चा त्याग करण्याबद्दल दिला जाणारा मोबदला होय.

अ) भांडवलाचा ब) रोखतेचा क) संपत्तीचा ड) पैशाचा

**19)** केन्शियन व्याजाच्या सिद्धांतानुसार व्याजदर..............मागणी- पुरवठ्या वरून निश्चित होतो.

अ) पैशाच्या ब) श्रमाच्या क) भांडवलाच्या ड) भूमीच्या

**20)** केन्स यांच्या मते पैशाची मागणी ........ हेतूने केली जाते.

अ) व्यवहार हेतू ब) दक्षता क) सट्टेबाजी हेतू ड) वरीलपैकी सर्व

**21)** पुढीलपैकी कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने नफ्याच्या जोखमीचा सिद्धांत मांडला आहे **?**

अ) हॉले ब) जे एम केन्स क) डेव्हिड रिकार्डो ड) जे बी क्लार्क

**22)** हॉले यांच्या मते नफा हे अवशेष स्वरूपाचे उत्पन्न आहे की, जे उत्पादकाला......... स्वीकारल्याबद्दल प्राप्त होते.

अ) जबाबदारी ब) जोखीम क) अनिश्चितता ड) वरीलपैकी सर्व

**23)** पुढीलपैकी कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने नफ्याच्या अनिश्चिततेचा सिद्धांत मांडला आहे **?**

अ) हॉले ब) जे एम केन्स क) प्रा नाईट ड) जे बी क्लार्क

**24)** प्रा नाईट यांच्या मते बाजारातील.......................मुळे नफ्याची निर्मिती होते.

अ) संशोधन ब) निश्चिती क) अनिश्चिती ड) वरीलपैकी सर्व

**25)** पुढीलपैकी कोणते धोके विमायोग्य नसतात म्हणजे अशा धोक्यांचा पूर्व अंदाज लावता येत नाही **?**

अ) तांत्रिक धोके ब) स्पर्धात्मक धोके क) व्यापार चक्रीय धोके ड) वरीलपैकी सर्व

**उत्तरे**

**1**-ब, **2**-क, **3**-क, **4**-ब, **5**-ब, **6**-ब, **7**-ड, **8**-ब, **9**-ड, **10**-अ, **11**-ब, **12**-अ, **13**-ब, **14**-ड, **15**-ब, **16**-क, **17**-ब, **18**-ब, **19**-अ, **20**-ड, **21**-अ, **22**-ब, **23**-क, **24**-क, **25**-ड

प्रा. अनिल सुतार
अर्थशास्त्र विभाग
(महिला महाविद्यालय कराड)